श्री

# जानकीस्वयंवरनाटक

हें पुस्तक

रा॰ रा॰ सखाराम बाळकृष्ण

सरनाईक

यांजकडून करवून

पुणें

पेठ शनिवार मेहुणपुरा

येथें.

रावजी श्रीधर गोंधळेकर यांणीं.

आपले

जगद्धितेच्छु छापखान्यांत

छापिलें.

ति माघकृष्ण १२ शके १८०५ स्वभानुनामसंवत्सरे.

किंमत ०५ टपालखर्च ०१

पुस्तकावर सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें गोंधळेकर

यांणीं सर्वप्रकारें आपला हक्क ठेविला आहे.

आवृत्ति १ ली.

# प्रस्तावना.

## जानकीस्वयंवर नाटक.

प्रस्तुत नाटकाचें इतिवृत्त सांगण्याची विशेष गरज नाहीं; का
च्या आर्यभूमिकेंतील आदिकवीनें नवरसभरित अशा रामाय
दि काव्यांत सविस्तर वर्णिलेलें असून आबालवृद्धांस तें प्रायः वि
हे व त्याची सामान्यतः सूचना नाटकाच्या नाम निर्देशावरून होत
र्ता कवीनें जानकीची स्वयंवर-कथा कोठपासून घेऊन कोठें तिचें प
लें इतकें मात्र सांगितलें पाहिजे.

या नाटकांत श्रीरामचंद्रास मागण्याकरितां विश्वामित्राचें
झालें येथपासून तें सीतेनें रामचंद्रास माळ घातली आणि दश
करून वरपक्षीय लोक येऊन विवाह समारंभ मोठ्या आनंदानें झा
पर्यंत कथा आणिली आहे.

यांत शृंगार वीर करुण अद्भुत व हास्य हे रस प्रसंगोपात्त या
त. व यांतील कविता बहुशः सरल व सुबोध आहेत.

आतां मूळ काव्य वर्णित कथेस नाटकाचें रूप देण्याचा उद्दे
आहे कीं काव्यांतून उदारकीर्ति अशा महापुरुषांचीं चरित्रें वाच
प्रत्यक्ष अभिनयपूर्वक प्रयोगांत पाहिलीं असतां प्रेक्षकांच्या म
रुषांच्या सद्गुणांचा व आचरणाचा ठसा तत्काळ व दृढ उत्पन्न हो
त्यामुळें आपण त्यांचें अनुकरण करावें अशी बुद्धि उत्पन्न होते. हें
म्हीं हें नाटक तयार करविलें आहे. तर यास सर्व समंजस लोक
तील अशी आशा आहे.

रावजी श्रीधर गोंधळेकर.

श्री

# जानकीस्वयंवरना-टक.

## अंक १ ला.

---

### पात्रें.

सूत्रधार, नटी, दशरथ, सुमंतप्रधान, भालदार, विश्वामित्र, तच्छिष्य, वसिष्ठ, राम, लक्ष्मण, कौसल्या, दासी.



## मंगलाचरण.

सूत्रधार :- पद (पंचतुंड नररुंड माळ धर पार्वतीश

याविश्वानें सृजुनि स्वयेंची नटुनि विश्वता जो पावे ॥ संदू- काकरि जाउनि गवसे महि रक्षणास्तव धांवे ॥ ध्रु० ॥ त्यांश्री- हरिचें चिंतन करितों विजयस्यंदनिं जो बसला ॥ सगुणत्वानें भार हराया सज्जनहृदयीं बहु रमला ॥ याविश्वातें० ॥ १ ॥ रा- धाधर मधुमिलिंद मुरहर नंदयशोमती सुखदाता ॥ अघ बक केशी संहारी जो कुमर जयाचा तो धाता ॥ याविश्वातें० ॥ २ ॥ साष्टांगें मी नमन करीतों पावि सिद्धी काव्य बरें ॥ कृपाघना यदुनाथ मुकुंदा चिंतन करितां मनुज तरे ॥ या- विश्वातें० ॥ ३ ॥ सखा राम प्रभु पूर्ण परात्पर येउनि सत्व- र तारावें ॥ संकट निधिं तुनि भोवरदा अज भावें त्वद्यश मीं गावें ॥ याविश्वातें० ॥ ४ ॥ ॥ ६ ॥

पद २ (दत्तात्रेय चतुर क्षरि मंत्र संत० या चालीं

आदिनाथ सुखदाता गुरुवर आत्रेय स्वामी ॥ अनाथ नाथा काय वदावा त्वद्यश महिमा मीं ॥ ध्रु० ॥ निगमा- गम तुज गाति दिननिशीं करुणाकर देवा ॥ भक्तकाम- कल्पद्रुम श्रीहरि ग्रहण करी सेवा ॥ आदि० ॥ १ ॥ सुर, वर मुनिवर योगीजन बहु त्वत्पद मनिं ध्याती ॥ दीनदया- ळा करुणासिंधो राहे मम चित्तीं ॥ आदिनाथ० ॥ २ ॥ आदिकाव्य रामायण पाहुनि नाटक करितों हें ॥ यथामती जानकीस्वयंवर पावन लवलाहें ॥ आदिनाथ० ॥ ३ ॥ स- खाराम प्रभु स्थिर चर व्यापक आदि अंतिं माजी ॥ ब्रह्म सनातन असे सदोदित पूर्णकाम आजी ॥ आदि० ॥ ४ ॥

(आपल्याशीं) अनंतगुण परमेश्वराचें स्तोत्र झालें इतकें पुरें आहे [illegible] रहीं जाऊन प्राण सखीचें मत ग्रहण करून तदनंतर प्रयोगा[illegible] आरंभ क[illegible]

(चहूंकडे पाहून) अहो! माझी प्राणप्रिया या ठिकाणीं [illegible] दिसत नाह[illegible]

(पडद्याकडे पाहिलेसें करून) काय चमत्कार सांगावा, ही माझी प्रिया स[illegible]

असतांना, माझ्याकडे अवलोकन करीत नाहीं, आणि कांहीं गुण गुणत आपल्या नादांत आहे; बरें तर काय ह्मणते तें श्रवण करूं.

( नटी प्रवेश करिते )

नटी- ठुंबरी ( जल भरन जात जमुनाके० या चालीं० )

साकेतीं नरशार्दुल प्रकटे लोक हिता स्तव श्रीरघुनाथ॥
ध्रु०॥ ब्रह्म सनातन पूर्ण परात्पर॥ सच्चिद्घन जो नारिअ
नाथ॥ साकेतीं०॥१॥ रविवंशोद्भव राम सुमित्रासूत॥
भरतहि शत्रुघ्न चतुर्थ॥ साकेतीं०॥२॥ रावणादिख
ल अखिल वधाया॥ कारण झाला कमलाकांत॥ साके
तीं नर शार्दुल प्रकटे लोक०॥३॥.

सूत्रधार- ( जवळ जाऊन ) प्राण सखे, जो अनंत कोटि ब्रह्मांड नायक प्रभु अवतीर्ण होऊन सर्वांचे मनोरथ परिपूर्ण करिता झाला व दुष्टांचा संहार करून ज्याणें धर्मस्थापना केली त्या श्रीरामचंद्राचे गुणवर्णनाच्या इच्छेनें मी जानकीस्वयंवर नामक नाटक करून दाखविणार आहें. तरि त्यासंबंधीं सर्व पात्रांची सिद्धता तूं सत्वर कर.

नटी०- प्राणनाथ, ही मी सिद्ध आहें आज्ञा मात्र व्हावी.

सूत्रधार०- प्राणसखे, या वसंत समयाचें कांहीं वर्णन कर बरें, नंतर नाटकास आरंभ करूं.

नटी०- बहुत उत्तम आहे.

पद ( देस राग )

सुखकर समय वसंत॥ आला सुखकर समय वसंत॥
ध्रु०॥ विषयि जनाला रम्य सदोदित॥ त्याया हाचि उसं
त॥ आला०॥१॥ नाना तरुसीं पल्लव फुटती॥ शोभति
रंग अनंत॥ आला०॥२॥ मंद मंद गति मारुत वाहे॥ शी
त सुरभि अत्यंत॥ आला०॥३॥ यज्ञपर्व जनि सांग क
राया॥ रमती संत महंत॥ आला सुखकर समय०॥४॥

सूत्रधार०- वाहवा! प्राणसखे, वाहवा! जें तूं ऋतुवर्णन केलेंस तें समयानुसार झालें या मुळें श्रवण करून सभाजनांसह माझें मन फारच समाधान पावलें.

साकी.

याचकरीनां साकेतीसी गाधिजमुनिवर जातो॥ महात्मसी विधिशीं स्पर्धा करुनि सृष्टि निर्मीतो॥ असतां राज, ऋषी आपण, तपानें घेजो विप्रपण॥१॥ ॥

( पड्द्यांत ) हा गायकाच्या लेका! अरे मी ब्रह्मर्षि असतां राजर्षि ह्मणांव यानें कारण काय? या विश्वामित्राचा पराक्रम विदित नाहीं!

**सूत्रधार.**— प्राण सरेंवे, आतां विश्वामित्र मख रक्षणार्थ दशरथ राजाजंवळ राम लक्ष्मण मागण्या करितां आला आहे. इतक्यांत माझ्या भाषणापासून त्याजला क्रोध आला असें वाटतें तर चल आतां येथून निघून जाऊं ह्मणजे झालें. (असें ह्मणून उभयतां निघून जातात.)

( ही प्रस्तावना झाली. )

---

## अयोध्या.

(आसनस्थ दशरथ राजा प्रधानासहित प्रवेश करितो.)

**राजा.**— प्रधानजी, रामचंद्राला षोडश वर्षे परिपूर्ण झालीं आहेत. आजपर्यंत राजकन्यका बऱ्याच आल्या परंतु जानकी वांचून त्याचें मानस अन्यराजकन्येकडे नाहीं. तशांत विदेह राजा तर त्र्यंबकचापभंगाची प्रतिज्ञा करून चुकला पण मी निश्चयानें सांगतों कीं, माझ्या रामभद्रावांचून त्याचें मनोरथ परिपूर्ण होणार नाहींत जसा योग असेल तसें घडेल. कारण असें वाक्य आहे—

श्लोक.

पूर्वदत्तेषु या विद्या पूर्वदत्तेच यद्धनं॥ पूर्वदत्तेच या भार्या साऽग्रे धावति धावति॥१॥

प्रधानजी, माझें मत असें आहे कीं,

श्लोक. ( शुद्धकामदा )

रत्न कोंदणीं जडविलें जसें॥ रामजानकीयुगुल हें तसें॥
योगिराज तो मज घडो बरा॥ व्याहि आदरें परिस चातुरा॥१॥

**प्रधान.**— राजाधिराज, उचित पदार्थाविषयीं प्रेम असणें हें साहजिक आहे, तथापि तो जर अप्राप्य असेल तर आपल्यास पश्चात्तापाला कारण होईल.

या करितां दुर्धर प्रतिज्ञेचा त्याग करून उत्तम कुलोत्पन्न, सुशील, रूपादि सकल गुण संपन्न अशा एखाद्या राजकन्येसमागमें विवाह करावा तो बरा परंतु अशा खटपटींत पडूं नये असें मला वाटतें.

( तदनंतर शिष्यासह विश्वामित्र प्रवेश करितो. )

प्रति०- राजाधिराज दशरथ राज महाराज, निगारोशाब कोई वृध्द तपोधन मुनीकी सवारी आती है.

राजा०-( सामोरा जाऊन वंदन करितो. )

साकी.

पदकमलातें वंदन करितो विश्वामित्रा भावें ॥ गाधिज
नाथा प्रेमें करूनी भावें त्वद्यश गावें ॥ बोलुनि या परिस-
न्मानानें, बैसवि आसनिं कुतुकानें ॥ १ ॥ ॥

विश्वामित्र०- ( शिष्यास ) कां व्रतप्रिया, पाहिलास ना चमत्कार. हा दशरथ राजा विप्रभक्ती विषयीं किती तत्पर आहे ? ( राजाकडे वळून )

पद ( वस्त्रानें देह सारा सुंदरिनें झांकिला. )

तुजला धो सर्व सौख्य मंगल ही भूपती ॥ वांछितार्थी सि-
द्धि होवो रिपु तुज ला कांपती ॥ ध्रु० ॥ धान्य वृद्धी कोश वृ-
द्धी बहु होवो आदरें ॥ पशु पक्षी सेवकांना करुणेनें पाहिं
रे ॥ जनरक्षीं सुता वाणी निरखुनिया न्याय रे ॥ चाल० ॥
रिपु संघा नाश होवो जगिं पसरो नांव तें ॥ तुजला धो ॥ १ ॥

राजा०- ( पुढें होऊन ) अहो तपोधन महाराज, हा अजराजनंदन दशरथ अभिवंदन करीत आहे.

विश्वामित्र०- राजा, मी सभेंत आल्या बरोबर आशीर्वाद दिलाच आहे त्या प्रमाणें तुझे सकल वांछितार्थ पूर्ण होवोत.

राजा०- ( हात जोडून ) पद. ( लहान वस्तु स्थूळ दिसली. )

दर्शनें पवित्र मी झालों ॥ पाहुनि मूर्ति मनीं धालों ॥ आनंदा-
मृत बहु प्यालों ॥ चाल० ॥ महद्भाग्य हें आजि उदेलें ॥ जा-
णुनि पदिं रमलों ॥ दर्शनें पवित्र० ॥ १ ॥

विश्वामित्र०- पद ( राग पिलु, ताल धुमाळी, बळसागर. )

नरकेसरि नृप रविवंशोद्भव पूर्वि श्रवण केले ॥ गुण गंभिर अतिउदार मतिचे नचि मीं निरखीले ॥ ध्रु० ॥ त्वत्सम राया न, जनीं माया करिसी दिन रजनीं ॥ प्रजापालनीं दक्ष बहु गुण रत्नांची खाणी ॥ नरकेसरि० ॥ १ ॥ रण पंडित तूं मंडित सद्गुणिं अखंडित राहे ॥ शक्रसंगरीं दैत्य वधियेलें जाउनि लवलाहें ॥ नरकेसरि० ॥ २ ॥ ईशकृपेचें पात्र तूं होसी राजस धनशाली ॥ पुत्र जाहले लोकपालवत् तुजला या काली ॥ ३ ॥ सतत मंदिरीं हर्षपाव तूं आशी ही घेणें ॥ दूरुनि याचक सदनीं आल्या इच्छित पुरवीणें ॥ नरकेसरि नृप रविवंशो० ॥ ४ ॥

राजा०—( हात जोडून ) महाराज, या दासाचें इतकें वर्णन करावयास नको. जी आज्ञा असेल ती करावी ह्मणजे झालें हा सेवक सिद्धच आहे.

विश्वामित्र०—राजा, तुह्मीं राजे लोकांनीं आमच्या सारख्या ब्राह्मणांचा सन्मान करावा आणि आह्मीं स्नान संध्या करून तुमचें अभीष्ट चिंतन करावें हें उभयतांचें विहित कर्तव्यच आहे. असो, परमेश्वर तुझी मनकामना पूर्ण करो. ( कांहीं विश्रांति घेऊन ) दशरथा, माझें आगमन वास्तविक याच करितां आहे याच्यावर लक्ष दे.

पद ( याडवडिलासिसेवित जावें ॥ स० याचाली० )

रामलक्ष्मण मजलागिं द्यावे ॥ यज्ञरक्षण कार्य करावें ॥ ध्रु० ॥ हेतु धरूनी मनिं आजि आलों ॥ पाहुनि तुजला राजा धालों ॥ राम० ॥ १ ॥ निशिचर येउनिया मखभंग ॥ करिती स्वांगें नको त्यांचा संग ॥ राम० ॥ २ ॥ हेंचि मागणें तुज मनुजेशा ॥ माझी करावी पूरित आशा ॥ राम० ॥ ३ ॥ ॥

राजा०—( विस्मित होऊन ) काय करावें ऋषीनें तर मोठें संकट आणिलें आहे, याचा काय परिणाम होईल तो होवो. ( असें ह्मणून दुःखित होतो. )

अंजनीगीत.

काय करूं मी त्रिजगत्पाला ॥ मागे मुनिवर माझ्या बाळा ॥ त्याविण माझी तनुही काळा ॥ अर्पण होइल कीं ॥ १ ॥ ॥

विश्वामित्र०- (राजा पुत्रमोहानें व्याप्त पाहून मनांत.) काय हा मायेचा तडाखा आहे हा साक्षात् पूर्ण परब्रह्म पुत्र असून याचा वास्तविक परिचय नाहीं. असो. आतां गुह्य तत्व ह्मणून जें आहे तें तर याला सांगूंच नये काय चमत्कार होतो तो पाहवा.

पद (वैशाखमासिं वासंतिक० या चालीं.)

जनकराजकन्यकेसि रघुपती भला ॥ संगमींच योग्य स दासुरवद भासला ॥ ध्रु० ॥ पुत्रयाचनेचें मीष करुनि पातलों ॥ नृपद्वारिं बघुनि विष्णू चरणिं रातलों ॥ दुर्धर ह रिभ्रकृति बहुत नाहिं मातलों ॥ चाल ॥ पुत्रमोह नृपा- वरी तिणें घातला ॥ जनकराजकन्यके० ॥ १ ॥

राजा०- (कांहीं सावध होऊन आपल्या मनांत.)

पद (नाहिं झाले षण्मास मला० या चालीं.)

काय माझा भोग न कळे आजि मातला ॥ ह्मणउनि मम सदनिं मुनिश्रेष्ठ पातला ॥ ध्रु० ॥ नवस करुनि यागिंहू- जालागिं सुरवविलें ॥ वृद्धपणीं कुमर मला च्यार जाहले ॥ दैववशें न- यनिं आजि मींच निरखिलें ॥ चाल ॥ देह कांतला ॥ १ ॥

हे परमेश्वरा, माझ्या सुकुमार पुत्राचे सोहळे मी अद्याप आपल्या दृष्टीनें अवलोकन केले नाहींत, तसेंच त्याजला युद्ध कसें करावें याविषयींही अद्यापि शिक्षण झालें नाहीं आणि राक्षस तर फार कपटी असतात. दुसरे पुत्रप्राप्तीकरितां शृंग ऋषीचा प्रसाद संपादन करून चार पुत्र लोकपालांसारिखे मला झाले, ते माझ्या सन्मुख जर नसतील तर माझे प्राण राहणार नाहींत.

पद (नाहिं झाले षण्मास मला राज्य० या०)

मृगा पाठिं गहनिं भ्रमत असुनि जाहला ॥ शब्द तदा वेश्य शीघ्र वधुनि टाकिला ॥ तज्जनकें पाहुनि मज शा- पदी धला ॥ चाल ॥ पुत्रशोकें निधन तुनें समय हा आला ॥ काय माझा भोग न कळे आजि मातला ॥ ह्म णउनि निज सदनिं मुनिश्रेष्ठ पातला ॥ २ ॥ ॥

(असें बोलून स्वस्थ राहतो)

विश्वामित्र०- कां दशरथ राजा, असा स्वस्थ कां बसला आहेस. कांहीं भाषण कां करीत नाहींस.

पद कडवें २ (येशगरवमासिधासंभिक०)

बोधियल्या सर्व गोष्टि पूर्विं भूपते ॥ मोहयुक्त केंवि होसि
सांग आम्हुतें ॥ विवेक करुनि भाष्य दिलें करि तूं पूरतें ॥
चाल ॥ सत्य कथिंन तरी जाय जीव त्रासला ॥ जनक राज
कन्यकेसि रघुपती भला ॥ २ ॥

(विश्वामित्रास कोप येऊन शिष्यासह सभेंतून जातो आणि राजा मूर्च्छित पडतो. प्रधान वसिष्ठास पाचारण करून आणितो.)

वसिष्ठ०- प्रधानजी दशरथ राजा तर अगदीं अचेतन पडला आहे आणि तपोनिधि विश्वामित्रही कोठें दिसत नाहींत. आतां करायें तरी काय! हा एक अनर्थच झाला आहे.

सुमंत०- गुरु महाराज, आपल्यास सर्व वृत्त निवेदन करितों.

पद कडवें १ (अभाग्याच्या घरीरे बाबा०)

यज्ञरक्षणा करितां मागीत कौशिक मुनिवर रामा ॥ सौ-
मित्रातें भूपति सन्निध वदे पूर्णकामा ॥ ध्रु० ॥ सुतमोहा-
स्तव व्याकुल दशरथ उपायनच चाले ॥ विनंति करितां गे-
ले मुनिवर नाहिं पुन्हा आले ॥ यज्ञरक्षणा० ॥ १ ॥

वसिष्ठ०- वाहवा, काय पहा या अज्ञानास ह्मणावें तरी. (राजाच्या देहावरून हस्त फिरवून) हे अजपालनंदना, सावध हो सावध हो, अशा पुत्रमोहांत व्याप्त होऊन कोस.

राजा०- (वसिष्ठ मुनीचा शब्द श्रवण करून सावध होऊन.)

पद १ (जातिकी मम शकुंतला ही आजनि०)

ब्रह्मसुता बहु काय कथूं मी देह चि हा खचला ॥ श्रीरामा-
विण नगमे मजला सौख्यद प्राण भला ॥ ध्रु० ॥ रक्षण करं-
णें माझे प्राणचि अथवा अजि पाहें ॥ रविवंशाचें सत्व द-
यानिधे तारीं लवलाहे ॥ ब्रह्म० ॥ १ ॥ कौशिक मुनिवर स-

दनीं घेउनि मागें तनयासी ॥ मखरक्षाया काय करावें सुरव-
वा कीं त्यासी ॥ ब्रह्मसुता ०॥ १॥

वसिष्ठ०- हर हर! दशरथ राजा, कायरे हा अनर्थ केलास, प्रधानजी तु-
ह्मी स्वतः अगोदर जाऊन विश्वामित्र ऋषीस माझा निरोप सांगून
संमेस घेऊन या. राजा, अशा मोहपाशांत बद्ध होऊं नको तुला आ-
तां गुह्य विवेक कथन करितों तो श्रवण कर. (असें ह्मणून राजाच्या का-
नांत सांगतो)

पद. (धन्य उषाही बाण कन्यका अति०)

प्राग्जन्मीं तूं कश्यप आणिक कौशल्याही अदिति स-
ती ॥ होतां तेव्हां परमात्म्याची केली तपस्या बहु सुम-
ती ॥ १॥ आमुच्या उदरीं जन्मा ये तूं ऐसा वर तुह्मि मा-
गितला ॥ श्रीहरिनें मग तथास्तु ह्मणुनी इच्छित हेतू
पुरवीला ॥ २॥ तद्नुत त्या जन्मा मधि वामन रूपें झाला
हरिकुमर ॥ पुढें तो सुतपा प्रजापती तूं पत्नी पृश्नी स-
कुमार ॥ ३॥ तेव्हां श्रीहरि पृश्निगर्भ हें नाम धरूनी सुत-
झाला ॥ तोचि चतुर्विध रूप विभू तुज दृश्य होउनी गृहिं ठे
ला ॥ ४॥ जनक गृहीं श्रीहरिची माया जानकि नामें अवतर-
ली, गाधिजयोगें प्रकृती पुरुषा पडेल ग्रंथी गा पहिली ॥ ५
॥ विधिप्रार्थनें करुनि श्रीपति तव वरदाना प्रगटे हा ॥ सखा
राम प्रभु करुणासागर स्थिर चर व्यापक नयनिं पहा ॥ ६॥

राजा०- (वसिष्टाचा उपदेश श्रवण करून)

पद (गजाननादे दर्शन सत्वर ॥ श्रमीमी०)

व्यर्थ प्रपंचीं मोहित झालों ॥ पाहुनि बाळा मानसिं धालों ॥
सद्गुणा निरखुनि या सद्रस प्यालों ॥ केंवि ब्रह्मा विस्मर-
लों ॥ ध्रु०॥ मुनि आज्ञेचा भंग मी करून ॥ कैसें केलें पात-
क ग्रहण ॥ अवगत नसतां ची रामनिधान ॥ केला मी अप-
मान ॥ व्यर्थ प्र० ॥ १॥ गुरुजी आतां काय करावें ॥ सन्मुनि-
चे पद मीं आकळावें ॥ त्याच्या क्रोधातें अजि शमवावें ॥ कीं
सत्पुत्रा अर्पावें ॥ व्यर्थ प्र० ॥ २॥

वसिष्ठ०- राजा अजनंदना, आतां स्वस्थ अंतःकरणें करून बैस, जें ब्रह्म-लिखित आहे तेंच सत्य होणार आहे. सीताराम विवाह या विश्वामित्राच्या योगानें निश्चित झाला आहे असें समज आणि तोच सिद्ध होईल. (असें ह्मणून त्यासह निघून जातो.)

(तदनंतर कोपानें व्याप्त झालेला कौशिक प्रवेश करितो.)

विश्वामित्र०- वाहवा!! काय हा राजा मदांध या रविवंशांत उत्पन्न झाला आहे! प्रभु रामभद्रास पुत्र समजतो काय? हें केवढें अज्ञान; आणि शोकांत निमग्न होतो काय हा चमत्कार पहा! (पश्चात्ताप पावून) माझा हा महान् अपराध आहे. ज्याच्या करितां साक्षात् पूर्णब्रह्मानें निर्गुण असतां साकारत्व धारण केलें. त्या पुण्यश्लोक नृपश्रेष्ठास मूर्ख ह्मणालों. तस्मात् मीच महा मूर्ख! कोपासारिखा दुसरा कोणीं दुष्ट नाहीं. हे नारायणा, या पतित शरणागताचें संरक्षण कर आणि या कोपरूपी महासर्पापासून याची मुक्तता कर (पुन्हां अयोध्येंत काय चाललें आहे तें ज्ञान दृष्टीनें पाहून)-

### ओंवी.

वसिष्ठें उपदेश केला॥ तेणें राजा सुखी झाला॥ प्रधान
आला न्यावयाला॥ मजलागीं सत्वरें॥ १॥

(इतक्यांत सुमंत प्रधान येतो.)

सुमंत०- (व्याकुळ होऊन)

### अंजनी गीत.

काय करावें अनर्थाला॥ मुनिकोपुनिया बाहिर गेला
॥ परत येउनी वर नृपतीला॥ देइल केंवि मुदें॥ १॥ इक्ष्वाकू
नृपराजसु वंशीं॥ कीर्ती विमला राहिल कैसी॥ वाटे चिं-
ता हे मानसीं॥ काय करूं देवा॥ २॥

(अकस्मात् विश्वामित्रास अग्रभागीं पाहून.)

हे विश्वामित्रच आहेत काय? त्या सारखे दिसतात तर खरें. आतां रथाचे अश्व लौकर हाकून त्यांस घेउन आलें पाहिजे.

(असें ह्मणून त्याच्या संन्निध जातो परंतु विश्वामित्र आवेशानें त्याकडे न पाहू

न चालूं लागतात.

सुमंत ०- ( रथाखालीं उतरून ) भगवन् अपर विरंचे, चरणयोःप्रणतोस्मि

विश्वामित्र०-(ओळखलेंसें करून ) सुमंता, मी मार्गक्रमणाच्या छंदांत निमग्न होतों. अस्तु तुला माझा आशीर्वाद आहे, शिवं ते भूयात्, बरें, येथें येण्याचें प्रयोजन काय तें निवेदन कर.

सुमंत०- स्वामी महाराज, दशरथ राजानें आपल्यास वंदन करून असी विज्ञप्ति सांगितली आहे कीं,

साकी.

प्रापंचिक मी अज्ञचि केवळ यातें उद्धाराया ॥ साकेतींतु-
म्हि यावें सत्वर विप्रोत्तम मुनिराया ॥ दशरथ भावें हें बोले
॥ परिसुनि मानसिं मुनि डोले ॥ १ ॥

स्वामी महाराज, याप्रमाणें राजाची प्रार्थना झाल्यावर वसिष्ठ गुरुजीनीं आपल्यास असा निरोप सांगितला आहे कीं, गृहस्थ क्षत्रियावर अकस्मात् आपण कोपायमान होऊन जाणें हें कांहीं आपल्या सारख्या समर्थांस योग्य नाहीं हें जाणून दशरथ राजाची कीर्ति आपण विमल ठेवावी.

विश्वामित्र०- ( मनांत ) आतां मात्र कोपाचें कवच विसर्जन केलें पाहिजे, कारण वसिष्ठाचें पाचारण आहे. पहा वसिष्ठ मुनि ज्या दिवसापासून मजला ब्रह्मर्षि ह्मणून पाचारूं लागले तेव्हांपासून चहूंकडे माझी मान्यता जाहली. ( उघड ) श्लोक ( शिखरिणी )

वसिष्ठाच्या योगें नरवर मनीं शुद्ध गमला ॥ असो येतों-
तेथें त्वरित सचिवा रोष न मला ॥ प्रभु श्रीरामाचे चरण-
कमलीं मस्तक बरें ॥ मुदें ठेवोनीया भवनिधि तरूं जाउ-
नि त्वरें ॥ १ ॥

( दोघे निघून जातात. )

( तदनंतर वसिष्ठासहित दशरथ राजा प्रवेश करितो. )

दशरथ०- गुरु महाराज, गाधिजास येण्यास इतका विलंब कां बरें लागला! याचें कारण समजत नाहीं. सुमंताची व त्याची भेट झाली कीं नाहीं, कोण

जाणें ! (इतक्यांत विश्वामित्र प्रवेश करितात.)

वसिष्ठ०- पद (तीन ताली ठुंबरीच्या चालीं.)

राया पाहसि काय आतां ॥ ध्रु० ॥ सत्वर जाऊनि चरण नमीतूं ॥ कौशिक मुनिनाथा ॥ १ ॥ तव सद्भावें उदय पावला यास्थळिं हा सविता ॥ २ ॥ राया० ॥ शांतवि त्यातें सन्मानुनिया ॥ काय कथूं गाथा ॥ ३ ॥ सखाराम प्रभु दाशरथीगुण ॥ गाउनि करि समता ॥ राया० ॥ ३ ॥

दशरथ०- (वंदन करून) महाराज, अनंत अपराधांची क्षमा करून या सेवकाचें संरक्षण करावें.

साकी.

अज्ञानानें जें घडलें पातक तें नमानिती आर्य ॥ मंदमती मी नदुपरि आहें चुकलें अपुलें कार्य ॥ आतां अवरा कोपानें ॥ रक्षा मुनिवर मातें ॥

विश्वामित्र०- दशरथ राजा, त्याविषयासंबंधीं माझ्या मुखांतून एकाही अक्षराचा उद्गार निघाला नाहीं. मग तूं अंतःकरणांत बापा खेद कां रे करितोस; अग्रभागीं जो कार्यभाग असेल तो कर म्हणजे झालें. अवकाश थोडा राहिला आहे.

(इतक्यांत रामलक्ष्मणांस पाचारण जातें व ते कुमारोचित वेषानें प्रवेश करितात.)

दशरथ०- (उभयतांस अंकावर घेऊन.) बालकानो, गाधिज मुनीच्या मखास निशाचर उपद्रव करितात. यास्तव त्या स्थलापर्यंत गमन करून यागाचें संरक्षण करावें. याप्रमाणें स्वामी महाराजांची इच्छा आहे आणि त्या अन्वयें माझी तुह्मांस आज्ञा आहे. तर सत्वर गमन करा, म्हणजे त्यांचे मनोरथ पूर्ण होतील.

रामलक्ष्मण०- (वीरश्रीनें)

पद (धस्कानें देह सारा सुंदरिनें झाकि.)

ताता या सूर्यवंशीं आह्मांसी जन्म हा ॥ असता ही शत्रु गांजी ऋषिलागी तें पहा ॥ ध्रु० ॥ करिं धरुनी चाप बाण

हरितों मी प्राणते ॥ दुष्टांचे त्यासि देतों मोक्षाचें स्थान तें ॥ मुनिवर्या तोषवूनी येऊन कीं वाटतें ॥ चाल ॥ सखा- • रामप्रभू बोले कुतुकातें या पहा ॥ नाताया० ॥ १ ॥

विश्वामित्र०- वाहवा! काय! मंजूळ आणि गंभीर, पराक्रम सूचक श- ब्दचातुर्य आहे पहा! कसें झालें तरि तें राजबीज मग काय पहावयाचें आहे! दशरथा, कुमरांच्या वाणीकडे चांगलें लक्ष दे.

दशरथ०- विश्वामित्र महाराज, पूर्वी अज्ञान बुद्धीनें मी पुत्राविषयीं विलाप केला परंतु आता अज्ञानाचें निरसन झालें हे उभयतां पुत्र आपण घेऊन जावें. आणि पुनरपि माझी त्यांची सत्वर भेट करा म्ह- णजे झालें. या दासांची विज्ञप्ति म्हणून इतकीच आहे

(विश्वामित्र हर्षभरानें उभयतां राजकुमारांस घेऊन जातो आ- णि दशरथ राजा विश्रांति घेण्यास उद्यानांत गमन करितो.)

ओंवी

तदनंतर कौशल्यासती ॥ सखियांसहित निश्चिती ॥
येती झाली सभेप्रती ॥ परम कौतुकें करूनिया ॥ १ ॥

कौशल्या०- अगे वासंतिके, पहा आज माझा दक्षिण नेत्र किती स्फु- रण पावतो तो यावरून काय अनिष्ट आहे तेंहि समजत नाहीं, करावें तरि काय मेलं! कोणी नागरिक स्त्रियाही आल्या नाहींत. आतां तूं प्रथमतां वसिष्ठ गुरुजीकडे जाऊन विघ्ननिरसनार्थ कांहीं हवन करण्यास सां- ग आणि तिकडून माघारी येतांना माझा रामचंद्र कोठें क्रीडा करीत असे- ल त्यासही घेऊन ये म्हणजे बरें होईल.

(इतक्यांत रथारूढ झालेले रामलक्ष्मण प्रवेश करितात.)

श्रीराम०- माते हा बालक रामचंद्र लक्ष्मणासहित वंदन करितो आहे

कौसल्या०- वत्सा चिरायू हो. (सिद्धता पाहून) कां रामचंद्रा, प्रा- णनाथांसमागमें तूं आरण्यांत मृगया करण्यास जातो आहेस काय?

दिंडी.

पर्थीं जातां तुज क्षुधातृषा लागे ॥ म्हणुनि कथितें बा- लका आजि वेगें ॥ उष्ण लागे तुज करिल कवण छा-

या ॥ विरह साहूं मी कैंचि राम राया ॥ १ ॥

श्रीराम०- साकी.

निज धर्मा मधिं निधन बरें हें परिपर धर्मा माजी ॥ मोक्ष
नसे गे यास्तव करितों क्रतुरक्षण महिमाजी ॥ धेनू द्विज-
वर रक्षाया ॥ जातों रिपु गण लक्षाया ॥ १ ॥

कौशल्या०- बालका, हीं शौर्ययुक्त भाषणें श्रवण करून माझ्या चि-त्तास परम आल्हाद प्राप्त झाला. पण बाई कोणिकडे प्रयाण आहे हें तर सांग!

राम०- माते, कौशिक मुनि काननांत देवतासंतोषार्थ मख करीत अ-सतां तेथें दुष्ट राक्षस येऊन उपद्रव देतात ते व्हां तात महाराजाचे आ-ज्ञेंकरून लक्ष्मणासहित कौशिक मुनीबरोबर जात आहें आपली आ-ज्ञा ग्रहण करण्यास आलों आहें. वंदन करितों.

(असें ह्मणून निघून जातात.)

कौशल्या०- अंजनी गीत.

काय करूं मी कैसें वदलें ॥ रामलक्ष्मण विपिनीं गेले ॥
क्षुधा लागतां उभया पहिलें ॥ पाहिल कवण वनीं ॥ १ ॥

(इतक्यांत वसिष्ठ येऊन उपदेश करितात आणि कौशल्येचें समाधान होतें.)

( सर्व निघून जातात.)

(नंतर पडदा पडतो.)

---


॥ इति प्रथमांक समाप्त. ॥

# अंक २रा.

## स्थळ.

## कामारण्य.

पात्रें- १ सूत्रधार- २ विदूषक- ३ राम- ४ लक्ष्मण- ५ अहल्या- ६ विश्वामित्र.




(सूत्रधार विदूषक प्रवेश करितात.)

विदूषक०- कां सूत्रधार, विश्वामित्र ऋषि रामलक्ष्मणांस घेऊन गेले, पुढें काय झालें तें तर सांगा पाहूं.

सूत्रधार०- मारिषा, रामलक्ष्मणांस गाधिज मुनीनें बलातिबलाविद्यांचें दान केल्यानें त्यांजला क्षुधा तृषेची बाधा झाली नाहीं.

विदूषक०- मग पुढें काय झालें.

सूत्रधार०- साकी.

कामारण्यीं दुष्टताटका रामें जाउनि वधिली ॥ सर्व जनां-
ला सौख्य जाहलें नीच कथा तुज कथिली ॥ केली शा-
पमुक्त तिजला ॥ परिसें भावें चरितांला ॥ १ ॥

गाधिजमुनि मख त्राण कराया राजकुमर ते गेले ॥ सु-
बाहु मर्दुनि खल निवटीले मारीच्या उडवीलें ॥ सागर
पार त्यातें केला ॥ परिसा भाविक सुख झेला ॥ १ ॥

विदूषक०- एकूण रामचंद्रानें पराक्रम करून राक्षसांचा पराभव केला, तदनंतर पुढें काय झालें तें सांगा पाहूं ?

सूत्रधार०- मारिषा, सावधान चित्तानें श्रवण कर . आतां रामचंद्र कामारण्यांत प्रवेश करणार तेव्हां अग्रभागीं काय चमत्कार होतो तो तर पहा.

विदूषक०- बहुत उत्तम आहे. आपल्यास तर तेंच पाहिजे.

(असें ह्मणून दोघे निघून जातात.)

( इतक्यांत विश्वामित्रासहित रामलक्ष्मण प्रवेश करितात )

विश्वामित्र०- रामचंद्रा, आतां आपण कामारण्यांत प्राप्त झालों, आणि ज्या कार्याकरितां दशरथराजापासून त्याचें पुत्र मागून आणिले, तो तर कार्यभाग झाला. येणें करून चित्ताचें ठायीं जो आनंद झाला तो या ब्रह्मांड भुवनांत समावत नाहीं.

दिंडी.

जनकनृपतीचें पत्र मला आलें ॥ लग्न जानकिचें करूं
सिद्ध झाले ॥ सकल राजे बाहूनि आणियेले ॥ ह्मणुनि
जातों मी तेथ सौख्य मेळें ॥ १ ॥ ॥

ओंवी.

रामा, लक्ष्मणासहित ॥ तुह्मीं यावें कौतुकार्थ ॥ सन्मा-
नें जनकें दशरथ ॥ स्वयंवरासी बाहिला ॥ १ ॥

राम०- स्वामी महाराज, आपल्या आज्ञेप्रमाणें आह्मीं येण्यास सिद्धच आहोंत.

विश्वामित्र०- उत्तम आहे, आतां रथ सिद्ध करण्यास सारथ्यास आ-

ज्ञा कर.

राम०-महाराज, स्यंदन तर सिद्धच आहे आपली सिद्धता असावी.

( सर्व विजय रथांत बसून मार्गक्रमणा करितात )

राम०-( एक निर्जन वन पाहून मनांत ) या अरण्यांत पशु पक्ष्यांचा संचार नाहीं व वृक्ष दग्ध झालेले दिसतात आणि उदकही नाहीं ( पूर्ण अवलोकन करून ) स्वामि महाराज, हें काय महदाश्चर्य !

श्लोक ( मालिनी )

सुरुचिर वन सारें जीव जंतून कोणी ॥ वसति किमपि
येथें व्यर्थ औदास्य कोणीं ॥ ह्मणउनि मुनिराया वृत्त तें
सर्व सांगा ॥ त्वरित मज दिसे सारें भासती रम्य जागा ॥ १ ॥

विश्वामित्र०-शाबास ! रामचंद्रा, शाबास !! बहुत उत्तम स्मरण केलेंस हें दग्धारण्य सपल्लव आणि जन सहित व्हावयाचा काल प्राप्त झाला आहे. आणि त्याचें अखिल उपादान तूंच आहेस.

पद ( सारंग )

( धन्य उषा ही बाणकन्यका अति लावण्याची खाणी० ॥ या चा० )

ह्मणे विधाता सुता अहल्या उपवर झाली ह्मणऊन ॥ म-
हीपरिक्रम करिल तयामी देईन कुतुकें हाचि पण ॥ धु०
॥ योगबळानें घटिकालानें करिप्र दक्षिण सद्भावें ॥ देऊन
कन्या वार्ता पसरे सुरवर ह्मणती अजि जावें ॥ १ ॥ गोत-
ममुनिनें हि सुरवी धेनू प्रसूतिकालीं पाहुनिया ॥ केलि
प्रदक्षिण तेणें भूमिक्रमणाचें फल होय तया ॥ २ ॥ च-
तुर्मुखानें दिधली कन्या गोतम मुनिला हर्षानें ॥ कार्यना-
सलें पाहुनि इंद्र हि तद्रूपा धरि कपटानें ॥ ३ ॥ एके दिव-
सीं गोतम मुनिवर मग अपराण्हा समयासी ॥ गंगास्ना-
ना जातां मागें आला सुरपति सदनासी ॥ ४ ॥ गोतमस-
दृशचि वेष धरुनिया बोले कांते मदन मला ॥ त्रास देत-
से भोगदान दे प्रार्थूं कुठवर मी तुजला ॥ ५ ॥ पतिवाक्या-
तें ऐकुनि कानीं करी वासना परिपूर्ण ॥ येतां गोतम गंगे-

वरुनी पाहे जाणे तें तूर्ण ॥ ६ ॥ कोपुनि मुनिवर बोले सं-
तितें होसिल गहनीं चंडशिला ॥ तिनें प्रार्थितां सद्भावा-
नें निजसि अनुग्रह मग केला ॥ ७ ॥ अतेमाजी नृपदाश-
रथी रमानाथ पथिं जातांना ॥ चरण धूलिनें तारिल तुं-
जला सर्व वृत्त या परि माना ॥ ८ ॥ उद्धरि रामा गौतम-
भार्या करि उपकारा याकाळीं ॥ फार काय मी सार सां-
गतों ब्रीद आपुलें सांभाळीं ॥ ९ ॥ सरवा रामप्रभु तैं दा-
शरथी बोले आज्ञा मज मान्य ॥ परि मुनिभार्या कौ-
सल्ये परि परस्पर्श तिस नचि धन्य ॥ १० ॥ ॥ ६ ॥

राम०- मुनिवर्य, आपली आज्ञा मला शिरसा मान्य आहे खरी परं-
तु. साकी.

वर्णांमाजी श्रेष्ठ द्विज त्यां माजि तपोधन जाण ॥ तत्पत्नी
तें स्पर्शें कसा मी होइल कीं अपमान ॥ सा धीत्रिजगहूं
द्याही ॥ यास्तव शंकित मन पाहीं ॥ १ ॥

विश्वामित्र०-( सप्रेम होऊन ) वत्सा रामचंद्रा, तुझी सरल हृदय-
ता किती ह्मणून वर्णन करावी! आमच्या सारख्या अनाथ जीवां करितां
आपण स्वतां सद्गुणत्व धारण करून वर्णाश्रमां प्रमाणें इतक्या नम्रते-
नें वर्तन करितो आहेस. तस्मात् तूं धन्य आहेस. रामा, हें भाषण अज्ञा-
नी जनांस योग्य परंतु आह्मां सारख्या परनिरतांस असें फसविणें यो-
ग्य नाहीं. मग व्यर्थ कशाकरितां मोहपाशांत बद्ध करितोस आतां या
गौतमभार्येचा उद्धार कर ह्मणजे झालें.

(रामचंद्र चरण धूलिनें स्पर्श करितो आणि ती दिव्य रूप धारण करू-
न प्रगट होते.)

अहल्या०- प्रभो जगन्नाथा, हे परमेश्वरा तुझ्या चरणकमल स्पर्शानें
परिपूत झालेली दासी अनन्यभावें करून तुला वंदन करित आहे. पति-
तोद्धारणा, तुझ्या स्तोत्रा विषयीं साक्षात विरंचि, चारि वेद आणि सहा
शास्त्रेंही कुंठित झालीं मग माझी अबलेची कथा काय?

पद. ( राग झिंझोटी. )

घडिघडि घडि चरण तुझे ॥ आठवती रामा ॥ आसनिंशयनीं भोजनिं छंद तुझा आह्मां ॥ ध्रु० ॥ दृश्यातित पूर्ण ब्रह्मनित्यनिर्विकारा ॥ अंबुजदलनयन विभो मुनिहृदयविहारा ॥ घडि घडि ० ॥ १ ॥ सर्वसाक्षि सर्वोत्तम सर्वसगुणरूपा ॥ प्रेममया सौख्य सिंधु दशरथकुलदीपा ॥ घडिघडि० ॥ २ ॥ तात माय बंधु नाथ तूंचि एक पाहीं ॥ केशव ह्मणे करीं दया शरण तुझे पायीं ॥ घडि० ॥ ३ ॥

राम०- हे महाभागे अहल्ये, तुजसारख्या महापतिव्रतेला दूषण ठेविणार याजगतांत कोण आहे? तूं स्वयमेव मुक्त आहेस, आणि माझा तुला असा वर आहे कीं, तुला इच्छामरण प्राप्त होऊन इह पर सुखाचा अनुभव तूं यथेच्छ ग्रहण करशील. आणि प्रभात काळीं जे तुझें नामस्मरण करितील ते पंच महा पातकां पासून मुक्त होतील. असो आतां मी प्रस्तुत अधिकाराप्रमाणें प्रणाम करितों, आशीर्वाद देऊन माझ्या ऐहिक सुखास वृद्धि कर, मागणें ह्मणून हेंच आहे.

अहल्या०- तथास्तु, रामचंद्रा, वर्णाश्रमां प्रमाणें मी तुला वंद्य आहें हें खरें परंतु वास्तविक पाहिल्यास तुझ्या चरण रजाची सेवा करण्याचाही अधिकार मला नाहीं. असो तर आतां वरदपाणि तुझ्या मस्तकावर ठेवून पतिचरणांची सेवा करण्याकरितां गमन करितें. (मस्तकावर हस्त ठेवून निघून जाते)

विश्वामित्र०- बा रामचंद्रा, रथाची सिद्धता सत्वर करा. आतां येथून जनकपूर सन्निध राहिलें आहे.

(असें ह्मणून सर्व निघून जातात.)

( दुसरा अंक समाप्त. )


---

# अंक ३रा.

## स्थळ.

जनकपुरांतील कृत्रिमोद्यान.

पात्रें-१ जानकी. २ कनकलतिका. ३ मदन कलिका. (जानकीच्या स०)




( सख्यांसह जानकी प्रवेश करिते. )

जानकी.—हे कनकलतिके, या शारदी पूर्णिमेच्या रजनींत किती तरी शोभा आहे ती. नाहींतर मेली अंधारी रात्र कांहिंच दिसायाचं नाहीं, सखे या शुभ्र चांदण्यांत चकोरीला आणि चंद्रविकसित कमलिनीला कितिबरें आनंद होत असेल! कारण, त्या चंद्रा करितां मुखें विकसित करून मार्गप्रतीक्षा करीत बसतात त्यांची आज चंद्रप्रकाशानें तृप्ति झाली आहे. पण ( इतकें अर्धे बोलून लज्जित होत्ये व पुन्हा दुसऱ्या रीतीनें वाक्य संपवित्ये. ) अशाही चंद्रिकेंत कोणी दुःखी असेल काय!

कनकलतिका.—( मनांत ) मैथिलीच्या मनांत विरहिणी स्त्रियांचें वर्णन करावयाचें होतें. पण लज्जेनें लागलीच गोष्ट बदलून टाकिली. असो आपण आतां अन्योक्तीनें तरी विनोद करावा. ( उघड ) सीते, तूं आपल्या मनांत असा विचार कर. सरोवरांत जरी चंद्रोदयीं कमलिनी मुखें विकसित करून मार्गप्रतीक्षा करितात. तरि त्यांचें गुप्त कारण एथकच आहे. तें असें कीं, अशा या चंद्रिकेंत भ्रमराच्या समागमें विहार करावा. याकरितां कमलिनी अतिशय उत्कंठित होऊन मार्गप्रतीक्षा करीत बसतात त्याप्रमाणें त्यांची इच्छा पूर्ण होते तसेच आपल्या मानवांतही चांदणी रात्र प्रियजन संयोगार्थ सुखावह मानिली आहे परंतु अशा कालांत ज्या एकाद्या तरुण स्त्रियेचा पति सन्निध नसेल तिला किति दुःख होत

असेल याचा विचार कर बरें.

जानकी०- कनकलतिके, कायंग, हा वहाडपणा मला हें खपायाचं नाहींहो, उगीच एखाद्याचा विनोद करणें ह्मणजे काय?

कनकलतिका०- जानकी, सहज जरी तुला भाषण केलें तर तूं रागावतेस आतां तुझ्याशीं वागावें तरी कसें. अगे मैत्रिणी या विनोदसुखाकरितांच आहेत त्यांतही एकांतीं ह्मणून मी तुझ्या प्रश्नासारखें उत्तर दिलें. तूं आपल्या पित्याच्या जवळ वेदांत ऐकत नेहमी बसतेस ह्मणून तुला हें भाषण लागलें असो, अतःपर बोलणार नाहीं हो.

जानकी०- (चकित होऊन.) सखे, तुला राग येण्यासाठीं मीं भाषण केलें नाहीं. एखादी चिंता मनुष्याच्या पाठिमागें असली आणि त्यांत कोणीं बोललें ह्मणजे त्यांतील भाव नसमजतां ते मनुष्य लागलींच रागावत असतें. माझेंही तसेंच झालें आहे तर या विषयीं क्षमा कर.

कनकलतिका०- (सखीकडे वळून) मदनकलिके, आपली प्रियसखी जानकी तर चिंताग्रस्त झाली आहे याचें कारण लक्षांत आलें काय? माझ्या मनांत आलें आहे पण बाई मी नाहीं बोलणार पुन्हा- सखी रागावली ह्मणजे भाषणाचें काय फळ?

मदनकलिका०- सखे कनकलतिके, राग आला तरी विदेहसुतेचा कोप क्षणिक आहे. तुझ्या मनांत काय आलें आहे सांग.

कनकलतिका०- साकी.

उपवर झाली जनकसुताही पतिवांचुनि सुखनाहीं॥
काय करावें विधिसूत्रातें मानसिं शोधुनि पाहीं॥ वल्ली
तरुवरि त्या चढती॥ देखुनि सीता मनिं कढती॥ १॥

जानकी०- सख्यानो, किती तरी थट्टा करितां, आणखि काय बोलायाचें असेल तें एकदाचें होऊं द्या, मनांत कांहीं खुरखर ठेवूं नका हो.

मदनकलिका०- हे सुहास्यवदने जानकी, आह्मी तुझा विनोद करितों असें तूं समजूं नको. हां वेडे यांत काय आहे?

श्लोक.

चकोरी बघे वाट चंद्रोदयाची॥ तसी कन्यका ती स्वयेंकीं

प्रियाची ॥ वसंताचिया कारणें कोकिला हो ॥ करीप्रेम-
युक्ता मुदें नित्य टाहो ॥ १॥ ॥

या प्रमाणें हे धर्म साहजिक आहेत नशांत तूं सर्व सुखानुभवयोग्य राजसुता आहेस मग तुला विवाहाची उत्सुकता लागली यांत अधिक तें काय ? ( इतक्यांत जानकी मूर्छित होते, तिला अंकावर घेऊन ) सख्यानो, आतां करावें तरी काय, ही मदनबाणानें संतप्त झाली आहे.

ओंवी.

ग्रीष्म ऋतू उष्ण जाण ॥ ननुतापलीनेत्र अरुण ॥ भासे
नस्त कटाह पूर्ण ॥ हृदय मज सखयेचें ॥ १ ॥

साकी.

सोमकांत मणि यांची चौकी आणुनि बसवा सीता ॥ ता-
प निवाया यागे सत्वर गातुह्मि कांहीं गीता ॥ सखिचें
तुष्ट करूनि मन, फिरुनि दाखवूं सुखवदन ॥ १ ॥

( सख्या जानकीस शीतोपचार करितात. )

जानकी०- ( मूर्छा सांवरून. ) उगीच मला शीतोपचार कशाकरितां करिता बरें.

पद ( कायमला भूल पडली भान हरप० )

ऊपचार शीत नको बाइ अज मला ॥ होति वेदनाचि ब-
हू लाभ नच भला ॥ ध्रु० ॥ युवतिजन्म कासयासि मही-
वरी आलें ॥ ह्मणुनि दुःखसागरांत मग्न जाहलें ॥ उपचार०
॥ १ ॥ कमलवलय कासियासि बांधिता करीं ॥ भासे मला
क्रूरसर्प डंसति झडकरी ॥ ऊपचार० ॥ २ ॥ हृदयीं कमल-
पत्र सये होय भल्लसें ॥ आजि चित्त स्वस्थ नाहीं सुखतरी
कसें ॥ ऊपचार० ॥ ३ ॥ व्यजन वात कांहिं नको उष्ण भा-
सतें ॥ चंदन उरि तीहि मला तीक्ष्ण लागते ॥ ऊपचारं० ॥ ४
सखाराम प्रभू कृपा करिल काय गे ॥ तरिच शांत होय
माझा सफल काय गे ॥ ऊपचार० ॥ ५ ॥

मदनकलिका०- ( संकेत करून हळूंच ) अगे कनकलतिके, मंदिरांत

जाऊन रामचंद्राची प्रतिमा लेखन केलेली आहे ती लौकर घेऊन ये (कनकलतिका जाऊन ती आणून देते.)

मदनकलिका०- सखे, तात महाराजांनीं उद्यिक स्वयंवराची योजना केली आहे आणि तुला अवलोकन करण्याकरितां एका प्रसिद्ध राजपुत्राची प्रतिमा पाठविली आहे, ही तुला आवडते काय? (जानकीचे हातांत देऊन.)

जानकी०- (नखशिखाग्र पाहून)

पद (तीरथ कोन करे हमारो तीरथ.)

वरील काय मला ॥ रघुवीर वरील काय मला ॥ध्रु०॥ स्वयंवरीं पण अति दुःसह्य पण ॥ मम हृदयीं रमला ॥ रघुवीर० ॥१॥ नरपति नंदन राम रघूत्तम ॥ पुरवी हेतु भला ॥ रघुवीर०॥ २॥ सखये कोमल कर बहु याचे ॥ कठिणचि पण गमला ॥ रघुवीर०॥३॥ सखाराम प्रभु ब्रह्म सनातन ॥ त्रिजगत भर भरला ॥ रघुवीर०॥ ४॥

मदनकलिका०- हे जनकराजनंदिनी, अद्यापि तुला कांहीं अवगत नाहीं काय? अगे पहा. अपल्या मनांतील कल्पनेप्रमाणें सर्व सिद्धताही झाली आहे.

जानकी०- (प्रेमयुक्त होऊन.) मदनकलिके, तूं खरेंच सांगतेस काय? शपथ वाहा बरें, नाहीं तर लपंडाव करसील हो; एखादा.

मदनकलिका०- (शपथ वाहून) (उघड) राजकन्यके, तुझ्या सन्निध मी कधीं तरी असत्य बोलल्यें काय? असें असतां मग कां बरें अशी ह्मणल्येस. (प्रेमालिंगन देऊन) आतां चला जलमंदिरांत विश्रांति ग्रहणार्थ चार घटिका जाऊं, तेथें थोडी निद्रा झाल्यावर तुला समाधान होईल.

(असें ह्मणून सर्व निघून जातात.)

॥ तिसरा अंक समाप्त. ॥

# अंक ४ था.

## स्थळ.

### मिथिलापूरराजसभा.

पात्रें– सूत्रधार १. विदूषक २. जनकराजा ३. शतानंद ४. प्रधान ५. राजे ६
रावण ७. विश्वामित्र ८. दशरथ ९. जानकी १०. रामचंद्र ११.



(इतक्यांत सूत्रधार व विदूषक येतात.)

**विदूषक०**- कां सूत्रधारराव, आतांसे तुह्मी फार गडबडींत आहांत याचें कारण कांहीं समजत नाहीं. तें सांगा तर खरें.

**सूत्रधार०**- अरे बावा तुला कांहीं भ्रम झाला आहे काय? विदेहराजाच्या गृहीं जानकीचें स्वयंवर मोठ्या थाटाचें चाललें आहे. तेव्हां चोहींकडे एकच धांदल होऊन गेली आहे.

**विदूषक०**- अहो फक्कड धांदल ती कशाची? उगीच कांहींतरी गप्पा मारिल्या ह्मणजे झालें.

**सूत्रधार०**- मारिषा, मी कांहीं तुझा विनोद करीत नाहीं. खरोखरीच जानकीचें स्वयंवर आहे तेव्हां जनकराजाचे पत्रावरून देशोदेशींचे राजे आले आहेत. त्यांची राहण्याची व्यवस्था प्रधानजीनें महाराजाच्या आज्ञेवरून ठेविली आहे. मीहि पण तिकडेच गेलों होतों धांदल ह्मणून काय ती हीच. आणखी ती काय असायाची. समजलास?

**विदूषक०**-(मान डोलवून) एकूण तुह्मी मिष्टान्नाचें घमेंडींत आहांत. आपल्यास-काय आणि होराळीवांचून पोट न जाय, परंतु माझा बोलण्याचा मुख्य हेतु हाच कीं, सांप्रत जे राजे प्राप्त झाले आहेत. ते कोण कोणचे देशांतील आहेत ते तरि समजूं द्या ह्मणजे बरें होईल

**सूत्रधार०**- सांगतों ऐक अरे आतां त्वरे मुळें फार कांहीं बोलत नाहीं एक कटाव संगीतांत ह्मणतों ह्मणजे कोण कोणत्या देशींचे राजे जानकीच्या स्वयंवरास आले आहेत ते तुझ्या सहज लक्षांत येईल.

(असें ह्मणून तालस्वरांवर ह्मणतो.)

## कटाव.

• कर्नाट, महाराष्ट्र, गौड, अणि गुर्जर, मरु, कुरु, जांगल, मालव
कान्यकुब्ज गांधार मद्रिंचे द्राविड नरवर सौराष्ट्रीचे आर्याव-
र्तीभिंधदेशींचे विदर्भ कौंकण केकय मत्स्यहि, कीकट सिंधू,
कुंतिराष्ट्रींचे, अंग, वंग, कालिंग, तालिंचें प्रांत उशीनर, मगध
अवंती सेकहि मैथिल, पांड्य देशिचे, अभीसार, अंबष्ठ मलद-
ही वल्लव आणिक अरट्ट काश्मिर अंतर्गिरि आणि बहिर्गिरी-

चे, त्रिगर्त, लोहित, किरात, उपगिरि, कांबोजाधिप चीनदेश-
पति ऋषक देशिचे, दशार्ण, अश्मक, किरात, उत्तर, हूण हार आणि
इंद्र उलूपति, कुलिंद अधिपति, यापरिचे नृप बहु देशींचे
रंगिं पातले सन्मानुनि त्यां सदनिं बसविलें बहु कौतुक झा-
लें ॥ चाल ॥ पातले नरपति ऐसे ॥ उद्भासि कुतुकें परिसे ॥ १ ॥

याप्रमाणें सर्व देशोदेशींचे भूपाल येऊन बसले आहेत आणि जनकरा-जानें त्यांचें आदर आतिथ्य करून संतोषित केलें आहे. आतां विश्वामित्रास-हित राम लक्ष्मणाचा प्रवेश समय आहे मीहि तिकडे समारंभ पाहण्याकरितां जाणार आहें तुझी इच्छा असेल तर माझ्या बरोबर चल, ह्मणजे सहज तो उ-त्सव दृष्टीस पडेल.

**विदूषक.**- अहो नाटकाचार्य आपण, छपन्न देशींचे राजे जनकपुरास आले आणि आतां जानकीच्या स्वयंवराचा उत्साह चालला आहे, ही एक मोठ्या आ-नंदाची गोष्ट सांगितली, बरें तर तुमच्या ह्मणण्याप्रमाणें तो समारंभ पाह-ण्यास मीही येतों.

**सूत्रधार.**- बहुत उत्तम आहे. चला तर.

(असें ह्मणून दोघे निघून जातात.)

(जनकराजा, शतानंद आणि प्रधानमंडळीसह प्रवेश करितो.)

**जनक.**- गुरुमहाराज, आजच स्वयंवराचा दिवस, तेव्हां पूर्वी आपल्याकडून देशोदेशीं राजास पत्रिका तर गेल्या आहेत. त्याप्रमाणें राजमंडळ अद्याप आलें किंवा नाहीं. याचा शोध करून या.

**शतानंद.**- विदेहराज, राजमंडल तर काल अस्तमानींच येऊन प्रविष्ट झालें आहे. त्याची व्यवस्था प्रधानजीनें यथासांग केली आणि ते सर्व राजे सभास्था-नीं प्राप्त झाले आहेत. अयोध्येचे अधिपति दशरथ महाराज मात्र अद्यापि यावयाचे आहेत दुसरें कोणी राहिलें नाहीं. आणखी मी कर्णोपकर्णी अशी वार्ता श्रवण केली कीं, दशरथ राजाचे पुत्र विश्वामित्रानें यज्ञरक्षणार्थ आणि-ले होते, त्यास घेऊन ते स्वयंवरास येत आहेत.

**जनक.**- (मनांत) सर्वव्यापक सच्चिदानंद विग्रहाचें आगमन तरी कोठून व्हा-वयाचें आहे आणि योगमायेचा लग्नाचा समारंभ त्याच्याशीं आज नवीन का

यह्मोणार आहे? तथापि ह्या सर्व गोष्टी त्याचे स्वच्छंदलीलेनुरूप होणाऱ्या आहेत. मानव हे निमित्त मात्र आहेत. ( उघड ) गुरुमहाराज, असें झालें तर माझे कन्येचें सार्थक होणार आहे. बहुत उत्तम आहे तर आतां आपण कौशिक ऋषीस आणावयास सामोरे जाऊं.

(इतक्यांत रामलक्ष्मणासहित गाधिज रंगसभेंत प्रवेश करितो.)

जनक०- मुनिमहाराज, हा दीनदास चरण कमलास वंदन करितो आहे

विश्वामित्र०- जनकराजा, त्वां मला वंदन करावें असा माझा अधिकार नाहीं. कारण माझ्या सारखे कोणी जरि आले तत्रापि विदेहा तुझ्या तपोबळाची साम्यता इतरास यावयाची नाहीं. कदाचित् मला हरिसुरबोद्भव विप्र ह्मणसील तर राजा मीही तुझ्या सारखा धनुर्धारीच आहें. मग बरें कारणावांचून मला कां लाजवितोस.

साक्या.

त्वच्चरणीं मीं वंदन करुनी आशीर्वच मागावें॥ हेंचि योग्य मज करितो नहूत् आधीं म्यां तुज गावें॥ वेदांताचें मूळपीठ॥ रामान्याहाळी तूं नीट॥ १॥ बा राजसुता या जनकासी जाउनि वंदी भावें॥ परिसुनि वाक्या करिती नहूत् किनित्या विनयागावें॥ परिसा ईश चरित्रें हो॥ तारक परम पवित्रें हो॥ २॥

जनक०- महाराज; आपण या कुमारास राजसुता असें संबोधन दिलें याचें काय बीज आहे तें सांगावें. ह्मणजे मनाचें समाधान होईल. हे कोणी तरी वीर पुत्र असावेत असा माझाही तर्क होतो परंतु आपल्या बरोबर आले असल्यामुळें निश्चय होत नाहीं.

विश्वामित्र०- विदेहराजा, हे कोणाचे पुत्र आहेत हें आपल्यास विदित नाहीं काय?

साकी.

दशरथ भूपति साकेताधिप हे त्याचे चि कुमार॥ जाण उभयतीं मखा आणिले रतिपति सम सुकुमार॥ रक्षोगण मखि भिवटा या॥ आणिले मागुनि मीं राया॥ १॥

हे राजाधिराज, या रामचंद्राचा पराक्रम किति ह्मणून वर्णन करूं!

श्लोक (इंद्रवज्रा.)

येतांचि पंथीं अजि तारिकेला ॥ मारूनि शस्त्रें भव पार केला ॥
यज्ञांत माझ्या बहु शीण झाला ॥ घेऊनि आलों विभु राघवाला ॥ १ ॥

आणखी पद्य- श्लोक

पुढें श्रीरामानें मम करिं महायज्ञहि भला ॥ वनामाजी तोषें मधु-
निखळ ते तें करविला ॥ अमेध्याची वृष्टी असुर करितां धारुनिति-
तें ॥ स्त्रखी केलें आह्मां वधुनि अवघे दुष्टमतितें ॥ २ ॥

दिंडी.

मत्प्रसंगें येतांचि सैंवराला ॥ मुक्त केलें मार्गांत अहल्येला ॥ श-
तानंदाची जननि ब्रह्मकन्या ॥ होय वंदुनि राघवा जगीं धन्या ॥ १ ॥

( विदेह राजा आणि शतानंद गुरु पुलकांकित तनु होतात )

शतानंद०- हे रविवंशोद्भव रामचंद्रा, तुझ्या उपकाराची उत्तीर्णता मी कोणत्या प्रकारें करूं. बहुत सहस्त्र वर्षें शिलारूप झालेल्या मातेस प्रस्तररूपापासून मुक्त केलेंस. आतां मी आपल्यांस अनन्य शरण होऊन आपलें अंतःकरण रूप तुलसीदल पदसरोरुहांवर समर्पण करितों.

(विश्वामित्र राम लक्ष्मणासहित ऋषिमंडळींत जाऊन बसतात.)

जनक०- प्रधानजी संपूर्ण पृथ्वीचे राजे येऊन रंगमंडपाचे ठायीं स्थित झाले आहेत या करितां त्र्यंबक चाप सर्वांस प्रदर्शित करून आपली प्रतिज्ञा श्रुत करावी ह्मणजे ज्याच्या आंगांत पराक्रम असेल तो आपलें सामर्थ्य प्रगट करील.

प्रधान०- (शिवचाप आणून) श्लोक. (भुजंगप्रयात.)

उठा हो उठा चाप तें सिद्ध आहे ॥ करावी त्वरा जो मनीं धैर्यवा-
हे ॥ नृपाज्ञें करा सज्ज कोदंड आतां ॥ नृपाची सुता मेळवा यो-
ग्य कांता ॥ १ ॥

( असें भाषण श्रवण करून व धनुष्य पाहून राजे भय पावतात ).

राजे०- (मनांत) अहो आपण या स्वयंवरास जर आलों नसतों तर फार चांगलें झालें असतें. कारण आतां हें त्र्यंबकचाप आमच्यानें कसें सज्ज होतें जर जनकाचे प्रतिज्ञेस अनुकूल नव्हावें तर आपल्या पदरीं क्षत्रियपणा आहे त्यास बाध येतो तर आतां कसें करावें. इकडे आड आणि इकडे विहीर अशी गत झाली आहे. (उघड) प्रधानजी प्रस्तुत आमच्या प्रकृती बि-

घडल्या आहेत तशांत आह्मी ह्मणजे जानकीच्या स्वयंवरीं तुमची प्रतिज्ञा सत्य करावयास आलों असें नाहीं सहज गत्यां मंगलोत्सव अवलोकन करावा. ह्मणून आलों आहों. समज लेंत आतां.

प्रधान०- (मनांत) पहा, काय राजांचें चातुर्य आहे तें. आतां या प्रतिज्ञासंकटांतून काय परमेश्वर पार पाडिल तें खरें. (अंगध्वज राजाकडे वळून) राजेसाहेब आपण आतां प्रथमतां उठावें, आणि धनुष्य सज्ज करावें

अंगध्वज०- प्रधानजी, आमचें क्षत्रिय कुळा मध्यें जनन आहे त्याप्रमाणें आह्मी चाप सज्ज करावें हें आपलें ह्मणणें बराबर आहे परंतु आज आमची चातुर्थिक शीतज्वराची पाळी आहे ह्मणून अनुमान नाहीं तर आपल्या सूचनेची मार्गप्रतीक्षा केली नसती.

प्रधान०- (मनांत) हे राजे वस्त्रालंकृत होऊन मोठ्या सभ्यतेनें येऊन बसले आहेत आणि वारंवार आप आपलीं शस्त्रास्त्रें सांवरीत आहेत परंतु प्रसंगीं असें बोलतात करावें तरी काय? (उघड) बरें असो. आतां सर्वांस विचारलें पाहिजे ह्मणजे त्यांचा पराक्रम सहज प्रगट होईल (प्रतापमुकुट राजाकडे वळून) कां महाराज! आपण तरी प्रतिज्ञेवर लक्ष द्यावें विनंति ह्मणून इतकीच आहे.

प्रतापमुकुट०- अहो प्रधानजी, तुह्मीं ह्मणतां तें सर्व सत्य आहे परंतु करावें तरी काय? कालपासून जो आमांश झाला त्यानें तर फारच बेजार केलें आतां आपल्या निमंत्रणा प्रमाणें जर रंगस्थळीं न यावें तर दिसण्यांत गौणत्व दिसणार यास्तव तें सर्व एकीकडे ठेवून कौतुक पाहण्याकरितां मात्र येऊन बसलों आहें. दुसरें कांहीं नाहीं.

प्रधान०- (मनांत) याचेंही सामर्थ्य समजलें. आतां हे जे गृहस्थ मोठ्या प्रौढतेनें बसले आहेत त्यांस विचारावें ह्मणजे झालें (उघड) कां अंगराज, आपण तरी इकडे लक्ष द्या.

अंगराज०- प्रधानजी फार काय सांगावें सुमारें आठ पंधरा दिवस झाले मस्तक शूळानें मला अतिशय त्रस्त केलें आहे त्यास उपाय नाहीं. नाहींपेक्षां एका क्षणांत चाप सज्ज केलें असतें.

प्रधान०- हूँहूँ! आपण तसेच पराक्रमी आहांत बरें असो. अहो कुळिंदाधिप.

या कोदंडास अवलोकन करा आणि सर्वांस आपलें सामर्थ्य प्रदर्शित करा.

कुलिंदाधिप०- प्रधानजी आपण ह्मणावें आणि आह्मीं ऐकून घ्यावें यांत ह्मणजे कांहीं अधिक शोभा आहे असें नाहीं परंतु करावें तरी काय? आज दोन मास होत आले क्षयरोगाची भावना जाहली आहे शामराज वैद्याची औषधी चालू आहे. जनकराजाचें पत्र आलें ह्मणून तावडतोब निघून आलों. आतां चार दिवस मंगलोत्सव पाहून स्वदेशीं निघून जाऊं ह्मणजे झालें.

प्रधान०- आतां करावें तरी काय सर्व पृथ्वीचे श्रेष्ठ श्रेष्ठ भूपति आले असून एकाचा ही उपयोग नाहीं. आतां जनकराजास कळवावें ह्मणजे झालें.

(असें ह्मणून विदेहराजाकडे निघून जातो.)

प्रधान०- (वंदन करून) महाराज, आपले आज्ञेप्रमाणें सर्व भूभुजास उत्तेजन दिलें परंतु कोणी उठत नाहींत. कांहीं तरी निमित्त सांगून स्वस्थ आसनीं बसले आहेत. आतां कसें करावें?

जनक०- (चिंताक्रांत होऊन) अहो काय चमत्कार सांगावा. सर्वभूमिपाळ आले असून एकही माझी प्रतिज्ञा सिद्ध करण्यास धैर्य धरीत नाहीं. काय भगवदिच्छा असेल ती खरी!

(इतक्यांत प्रधाना सहित दशग्रीव प्रवेश करितो.)

रावण०- सचिवा, हे सभासद केवळ महामूर्ख आहेत. ते कसे ह्मणशील तर सांगतों एक.

साकी

उत्थापन मज कोणि न देती काय मत्त हे असती॥ जगतीपति
मीराक्षस राजा॥ जनक भूपती कुमती॥ ॥

(मनांत) अहो पण या समाजांत रामचंद्र आला आहे काय? असें जर घडेल तर आपले मनोरथ सिद्ध होणार नाहींत (अग्रभागीं अवलोकन करून) कायहो आश्चर्य आहे हा घन श्याम मूर्ति रघुनाथ असावा (उघड) अमात्या या सकल वीरांत कायतीं हीं दोन मुलेंच मला भयउत्पन्न करितात नाहींतर मी कोणांस मानणार आहे काय! असो त्यांचा समाचार घेतां येईल परंतु अगोदर जानकी मिळाली पाहिजे (मोठ्या प्रौढतेनें) जनका, तुझा काय पण आहे तो सांग आणि अगोदर जानकी कोठें आहे तीपु-

होवयास मिळाली पाहिजे ह्मणजे तुझा काय पण आहे तो परिपूर्ण करितों

जनक०- दिंडी.

जनक बोले शिवधनू भग्न व्हावें ॥ उपरि सीता कर कंज
तें धरावें ॥ असें न घडे तरि त्वरित निघुनि जावें ॥ सकलनृ-
पहो मद्वाक्य आयकावें ॥ १ ॥

रावणराज, आपण माझी प्रतिज्ञा सिध्द करा ह्मणजे लागलीच जान-
की घेऊन माळ घालील मनांत कांहीं शंका धरूं नका

रावण०- अँः राजा, प्रतिज्ञा काय घेऊन बसलास प्रतिज्ञा सिद्ध झालीच
असी कल्पना कर. आतां लवकर जानकी घेऊन ये ह्मणजे झालें.

जनक०- लंकाधीशा, प्रतिज्ञा ह्मणजे आपल्यास अधिक आहे असें नाहीं
परंतु इतकें झालें पाहिजे.

साकी.

शिवधनु तें गुण लाविल जो का वीर शिखामणि भावें ॥
त्यासि जानकी घालिल माळा येउनि हें समजावें ॥ प्रति
ज्ञापरि साची आतां ॥ यापरि कथिली ही गाथा ॥ १ ॥

रावण०- श्लोक.

कैलासा हलवी बळें धरुनियां देवादिकां गांजिना ॥ आहे
रावण दैत्यराज भर हा काळा पती शासिता ॥ ऐशातें धनु
नेटकी अणवुनी द्यावी अतां कौतुकें ॥ चित्तीं शोधुनि पाहि
तूं मम बळा जें या जगा ठाउकें ॥ १ ॥

शतानंद०- महाराज, आपण ह्मणतां तें सर्व खरें परंतु हातच्या कांकणा-
स आरसा कशास पाहिजे. धनुष्यास गुण लावा ह्मणजे झालें उगीच
वल्गना करण्याचें प्रयोजन नाहीं.

रावण०- ( क्रोधाविष्ट होऊन रामचंद्राकडे पाहतो ) याच कारट्यानें मला
बहुत उपद्रव दिला आहे असो आतांच या कांबिटाचीं शकलें करून टाकि-
तों नंतर त्याचा समाचार घेतों जनका हा पहा धनुष्याचा भंग केला. आतां
जानकी आण. असा स्वस्थ कां बसलास?

शतानंद०- दशानना, ही पहा जानकी आली धनुष्याचा भंग कर ह्मणजे

झालें

(रावण कोदंड घेऊन सज्ज करीत आहे तों जानकी त्यास पाहून ह्मणते)

जानकी०- शिव शिव परमेश्वरा, आतां या धष्टपुष्टानें जर धनुष्याचा भंग केला तर मात्र विलक्षण प्रसंग प्राप्त होणार आहे याकरितां आपलें जें आराध्य दैवत कैलासनाथ याचें चिंतन करावें ह्मणजे तो सकल संकटांपासून मुक्त करील. (असें ह्मणून शंकाराची स्तुति करिते)

### श्लोक.

धांवें शंकर संकटांत मजला नारीउमेच्या धवा॥ आला कोठुनि दुष्ट दैत्य इकडे पाहीं विभो येधवां॥ रामावांचुनि काय वांछुनि वृथा जाणोनियां प्रार्थितें॥ वारीं हें मम विघ्न शीघ्र सदया चिंतूनियां वंदितें॥ १॥

(याप्रमाणें जानकीचें स्तवन श्रवण करून शंकरानें चापावर आपले असंख्यात गण गुप्तपणें बसवून तें धनुष्य भारभूत केलें)

शतानंद०- दशानना, ही जानकी आली धनुष्याचा भंग कर.

(दशकंठ चाप उचलण्यास जो प्रयत्न करितो तों तें चाप त्याचे हृदयावर पडतें)

रावण०- (धनुष्याच्या भारानें त्रस्त होऊन.)

### अंजनी गीत.

शिवशिव पाशामाजी पडलों॥ दुर्दैवानें कैसा अडलों॥ याचि कां बिरा नच्छि सांपडलों॥ उपाय नच कांहीं॥ १॥ मजपासुनि अपराध जाहला॥ काय दयाब्धे यास्तव घाला॥ सभेमाजी सत्वर आला॥ नचले बळ कांहीं॥ २॥ पूर्णभक्त मज मानुनि दिधलें॥ आत्मलिंग तें जें कां पहिले॥ सखाराम प्रभुपुढें बाहिलें॥ केवळ मी जाणा॥ ३॥

### श्लोक.

कोणी धांवुनि वांचवा मज सभेमाजी भले येउनी॥ झालों दीन नसा बहू विकळ हो हा रंगणीं पाहुनी॥ प्राणांचें अजि दान द्या कवतुकें केंवी धरूं धीर हा॥ साष्टांगें नमितों मुदें नृपवरा कीं क्लेश होतो महा॥ १॥

जनक०- (अशी रावणाची दुर्दशा पाहून मनांत) निर्वीर मुर्वीतलं ? या पृथ्वीवर क्षत्रिय ह्मणून अवशिष्ट राहिला नाहीं काय ?

विश्वामित्र०- (जनकानें भाषण ऐकून प्रेमानें) प्रभो रामचंद्रा आतां काय पाहतोस तुझें ब्रीद हेंच आहे कीं शरणागताचें संरक्षण करावें तर आतां सत्वर ऊठ त्या मरणोन्मुख दशकंठास प्राण दान दे.

रामचंद्र०- (शौर्यानें उठून) स्वामी महाराज आपल्या आज्ञेचीच केवल मार्ग प्रतीक्षा करीत आहे (असें बोलून शिव धनुष्य उचलून गुण लावितांच त्याचा भंग होतो व जानकी मोठ्या प्रेमोत्सवानें रामचंद्रास माळ घालते आणि रावण लज्जित होऊन लंकेंत प्रवेश करितो)

(इतक्यांत साकेताधिप दशरथ राजा परिवारांसह प्रवेश करितो.)

मंत्री०- महाराज, अयोध्याधीश दशरथ राजाची स्वारी प्राप्त झाली आहे तस्मात् त्यास सामोरे चलावें.

जनक०- (हर्षित मुद्रेनें सामोरा जाऊन प्रेमालिंगन देतो.)

साकी.

अखिल पावले सिद्धिस हेतु नाणि मानसीं कांहीं ॥ रामें भंगुनि कोदंडातें वरिली हो वैदेही ॥ राया कौतुक हें झालें ॥ पाहुनि वधुवर मन धालें ॥

तर आतां विवाहा संबंधीं जें मंगल कर्तव्य असेल तें आपल्या अनुज्ञेप्रमाणें करण्याची माझी इच्छा आहे

दशरथ०- जनकराजा, या कृत्यांत माझ्या कडे काय आहे ? सर्व अधिकारी गाधिज मुनि आहेत. मी केवळ निमित्त मात्र आहे त्यांचे मतानुसार जें विहित असेल तें करावें.

विश्वामित्र०- दशरथ राजा, आतां आणिक कांहीं करावयाचें नाहीं. क्षत्रियकुलाचारा प्रमाणें स्वयंवरोत्तर जे संस्कार राहिले आहेत ते तुज करितांच ठेविले आहेत ते संपादन करून नंतर अयोध्येस जाऊं ह्मणजे झालें.

दशरथ०- बहुत उत्तम आहे. (असें ह्मणून लग्न समारंभ करितात. वाद्यें वाजतात. सर्वांस आनंद होतो.) असें झाल्यावर सर्व निघून जातात. (चतुर्थांक संपूर्ण)

**समाप्त.**